६

# मोहनदास करमचंद गांधी

जन्म : २ ऑक्टोंबर १८६९
मृत्यु : ३० जानेवारी १९४८

**प्रास्ताविक व अल्पपरिचय :-**

मोहनदास करमचंद गांधी ऊर्फ महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ ला गुजरात मधील पोरबंदर येथे झाला. त्यांच्या घरचे वातावरण अंत्यत धार्मिक होते. धर्मश्रद्धेचा वारसा त्यांना त्यांच्या मातेकडून मिळाला. महात्मा गांधी मानवतावादी होते. धर्म आणि राजकारणाचा समन्वय साधून राजकारणाला आध्यात्मिक दर्जा दिला. रुढार्थाने पाहाता महात्मा गांधी राजकीय विचारवंत नसले तरी राजकीय विचारात त्यांचे योगदान मोलाचे आहे. म्हणूनच देश त्यांना राष्ट्रपिता मानतो. राष्ट्राची उभारणी करण्याचा पाया गांधींनी घातला. भारतीय स्वातंत्र्य लढयातील त्यांचे नेतृत्व अलौकीक अतुलनीय अशा स्वरुपाचे होते. वास्तविक गांधीजींनी काँग्रेस पक्षात किंवा सरकारमध्ये कोणतेही लहानमोठे पद स्वीकारले नाही. कोणत्याही सत्तेशिवाय केवळ नैतिक बळावर पक्ष व सरकारवर नियंत्रण ठेवले होते म्हणूनच त्यांना राष्ट्रपिता मानले जाते.

गांधीजींचे प्राथमिक शिक्षण राजकोट येथे झाले. १८८७ मध्ये मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ते इंग्लंडमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले. १८९१ मध्ये बॅरिस्टर झाल्यावर ते भारतात परत आले. इंग्लंडमध्ये त्यांची गाठ दोन थिऑसाफिस्ट मित्रांशी पडली. त्यांचा सहवास गांधीजींच्या जीवनाला नवी दिशा दाखविण्यास कारणीभूत ठरला. त्यांच्या प्रेरणेंनी

त्यांनी श्रीमद्भगवद्गीतेचा अभ्यास चालू ठेवला. त्याचबरोबर कुराण, बायबल, इत्यादी धर्मग्रंथांचा ही त्यांनी अभ्यास केला. भारतात परतल्यावर काही दिवस त्यांनी वकिली व्यवसाय केला. १८९३ मध्ये गांधींजी एका खटल्याच्या निमित्ताने दक्षिण आफ्रिकेत गेले. ही घटना त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली.

**नाताळ काँग्रेसची स्थापना :-**

दक्षिण आफ्रिकेत महात्मा गांधींना स्वत:ला वर्णद्वेषचा अनुभव आला. निग्रो आणि भारतीयांना गोरे लोक जे संख्येने थोडे होते तरी तुच्छतेने, तिरस्काराने वागवीत असत. रेल्वेच्या प्रथम वर्गाचे तिकीट गांधीजीजवळ होते. ते बॅरिस्टर होते तरी ते रंगाने काळे म्हणून त्यांना रेल्वेच्या डब्यातून गोऱ्या अधिकाऱ्याने सक्तीने उतरविले. गोरे काळे हा वर्णभेद दक्षिण आफ्रिकेत अधिकृत व कायदेशीर होता. हॉटेल्स, बसेस काळ्या गोऱ्यांसाठी वेगळ्या असत. हे पाहून गांधीजींना संताप आला. याला वाचा फोडण्यासाठी गांधींनी नाताळ काँग्रेसची स्थापना केली. गोऱ्या लोकांविरुद्ध लढण्यासाठी गांधीनी नवे शस्त्र शोधून काढले ते म्हणजे सत्याग्रह. १८९४ पासून १९१५ पर्यंत गांधींनी अहिंसा आणि सत्याग्रहाच्या मार्गाने ब्रिटीश जुलूमशाहीविरुद्ध लढा चालू ठेवला. वकील या नात्याने एक खटला चालविण्यासाठी गेलेले गांधी एक क्रांतीकारक बनले. गुलामगिरीत जीवन जगणाऱ्या तेथील लोकांमध्ये त्यांनी आत्मविश्वास निर्माण केला. त्यांच्या लढण्याचे तंत्र यशस्वी ठरले. भारतात परतल्यानंतर त्याच तंत्राचा उपयोग भारतातही केला. आणि त्यात ते यशस्वी ठरले.

**भारतातील परिस्थिती :-**

१९१४ मध्ये गांधीजी दक्षिण अफ्रिकेतून भारतात परत आले. त्यावेळी भारताची परिस्थिती दारुण स्वरुपाची होती. त्यांचे राजकीय गुरु ना. गोखल्यांनी गांधींना संपूर्ण भारतभ्रमण करुन परिस्थितीचे नीट अवलोकन करुन, अनेक लोकांशी चर्चा करुन कार्याची दिशा ठरविण्याची सूचना केली होती. त्यानुसार गांधीजींनी भारतात भ्रमण केले. बनारस हिंदू विद्यापीठात त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, स्वातंत्र्य आपणहून प्राप्त होणार नाही. त्यासाठी प्रखर लढयाची तयारी करावी लागेल. गांधींचे विचार तत्कालीन जहाल आणि मवाळ या दोन्ही विचारसरणीच्या नेत्यांना मान्य होते.

**१९२० पर्यंतचा काळ :-**

गांधी भारतात आले त्यावेळी लोकमान्य टिळकांचे नेतृत्व होते. मुस्लीम लीगची स्थापना झाली होती. बिहारमधील चंपारण्यात मजुरांवर अत्याचार होत

होते. त्याविरुद्ध त्यांनी लढा सुरु केला. गुजरातमध्ये साराबंदीसाठी शेतकऱ्यांनी चळवळ उभी केली. १९१९ मध्ये वैशाखीला पंजाबमध्ये जालियनवाला बागमध्ये निरपराध लोकांचे प्रचंड हत्याकांड झाले. त्याचकाळात रौलट ॲक्ट पास झाला. त्याविरुद्ध गांधींनी अहिंसात्मक लढा सुरु केला. संपूर्ण देशात ब्रिटीशाविरुद्ध संतापाची लाट पसरली. चळवळीला हिंसक वळण लागल्यामुळे त्यांना चळवळ मागे घ्यावी लागली. याचकाळात गांधींनी यंग इंडिया साप्ताहिकाची सुरुवात केली. खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला. होमरुल चळवळ गतीमान करण्याचा प्रयत्न केला. हरिजन साप्ताहिक सुरु केले. कलकत्यातील भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात गांधींजींचा असहकाराचा ठराव संमत झाला.

**राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्व :-**

पहिल्या महायुद्धात गांधींच्या सुचनेनुसार सरकारला सहकार्य केले आणि सरकारने स्वराज्य दिलेच नाही, विश्वासघात केला. तोंडाला पाने पुसली असे गांधीसह सर्वच नेत्यांना वाटले. नेमके याचवेळी १ ऑगस्ट १९२० या दिवशी टिळकांचे निधन झाले. आणि गांधींजीकडे नेतृत्व आले. भारतात गांधीयुगाला प्रारंभ झाला. जहालवादाचा त्याग करुन शांततामय सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य प्राप्तीचे ध्येय ठरविण्यात आले. १९३० साली गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. लंडनमधील गोलमेज परिषदेत त्यांनी भाग घेतला. परंतु त्यांच्या मताची दखल घेतली गेली नाही. पुन्हा त्यांना सत्याग्रहाच्या चळवळीकडे वळावे लागले. सत्य, अहिंसा व असहकार याद्वारे गांधीजी स्वातंत्र्य चळवळीला नैतिक अधिष्ठान प्राप्त करुन करुन दिले कायदेभंग, बहिष्कार, मिठाचा सत्याग्रह यांच्या माध्यमातून त्यांनी जनतेत जागृती निर्माण केली. हिंदू-मुस्लीमांचे दंगे थांबविण्यासाठी त्यांनी २१ दिवसांचे उपोषण केले.

**चलेजाव आंदोलन :-**

१९४२ साली शेवटचे आंदोलन. गांधीनी ब्रिटीशांना चलेजाव (Quit India) म्हणून सुरु केले. करेंगे या मरेंगे असा जनतेला आदेश दिला हजारो अनुयायांना यावेळी अटक करण्यात आली. स्वातंत्र्य आंदोलन तीव्र बनले. पण हिंदू मुसलमानांचे ऐक्य मात्र साध्य होऊ शकले नाही. गांधींना याची शेवटपर्यंत खंत राहिली स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी फाळणीच्या रुपात त्याची जबरदस्त किंमत द्यावी लागली. गांधींना नाईलाजास्तव फाळणीचा निर्णय मान्य करावा लागला. याबाबतीतला पराजय स्वीकारावा लागला ती एक अटळ अशी वस्तुस्थिती होती.

**स्वातंत्र्य प्राप्ती :-**

१५ ऑगष्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले स्वातंत्र्यानंतर गांधीजींनी कॉग्रेसपक्षाच्या विसर्जनाची कल्पना मांडली होती. परंतु ती व्यवहारात येऊ शकली नाही. दिल्ली शांत व्हावी म्हणून गांधीजी रोज सायंकाळी बिर्लाभवन परिसरात सामुदायिक सर्वधर्मीय प्रार्थना करण्याचा उपक्रम सुरु केला. अशाच एका सायंकाळी ३० जानेवारी १९४८ या दिवशी नथुराम गोडसे नावाच्या एका माथेफिरुने गांधींचा पिस्तुलाने गोळ्या घालून खून केला. अहिंसेचा पुजारी देशबांधवाकडूनच ठार झाला. स्वातंत्र्यासाठी अहर्निश झगडणारे गांधी स्वातंत्र्यानंतर एक वर्षाच्या आत मारले गेले ही किती दुर्देवी घटना आहे. त्यांच्या वधाने त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले. आधीच महान असलेले गांधीजी हुतात्मा होऊन खऱ्या अर्थाने महात्मा झाले.

**ग्रथसंपदा :-**

गांधीजींनी आपले विचार प्रामुख्यांने हरिजन, यंग इंडिया या साप्ताहिकातून मांडले आहेत. हिंद स्वराज्य, गीताबोध, आत्मकथा, माझे समकालीन, सर्वोदय, मंगलप्रभात, ब्रम्हचर्य, राष्ट्रवाणी, ग्रामसेवा, खादी, आत्मशुद्धी, गीताई, धर्मनिती, नीतिधर्म, आरोग्याची गुरुकिल्ली, आश्रयवासियाकडून सत्यवीराची कथा, रामनामाचे महत्त्व, सत्याग्रह, अनासक्ती योग, सत्याचे प्रयोग अशी त्यांची ग्रंथरचना आहे. प्रामुख्याने गांधीचा दृष्टीकोन हा मानवतावादी होता.

**गांधीजीवरील प्रभाव :-**

सत्याचे प्रयोग हे त्यांचे आत्मचरित्र वाचल्यानंतर ते किती प्रांजळपणे लिहिले आहे याचा प्रत्यय येतो. गांधीजीवर त्यांच्या आईवडीलांचे उत्तम संस्कार होते. शिक्षण आणि व्यवसायासाठी एकूण ३० वर्षे परदेशी राहूनही त्यांनी पाश्चात्यांचे अनुकरण केले नाही. किंवा त्यांनी कधीच मांसाहार आणि मद्यप्राशन केले नाही.

**१) भगवद्‌गीतेचा प्रभाव :-**

The Gita is my mother असे गांधीजी म्हणत. गीतेचा गांधीजींवर फार मोठा प्रभाव होता. जेव्हा मी निराश होतो तेव्हा गीतेकडे वळतो असे ते म्हणत. गीतेला ते मार्गदर्शक मानीत असत. गीतेतील स्थितप्रज्ञतेचा गांधीजींवर मोठा प्रभाव होता. फळाची अपेक्षा न करता कर्म करीत राहा. असा गीतेचा संदेश आहे. संसारिक पाशात जेंव्हा आपण किंकर्तव्यमूढ होतो तेव्हा गीतेचा फार मोठा आधार मिळतो असेही ते म्हणत असत.

**२) अहिंसेच्या तत्वाचा प्रभाव :-**

भगवद्‌गीता या हिंदू धर्म ग्रंथाप्रमाणेच इतर धार्मिक ग्रंथांचा गांधीजीवर प्रभाव होता. जैन आणि बौद्ध धर्म त्यात प्रमुख होते. गांधींचा अनेक जैन साधूंशी आणि बौद्ध मुनींशी संबंध आला होता. या दोन्ही धर्मात अहिंसेला मोठे स्थान आहे. गांधीजींनी सामाजिक आणि राजकीय जीवनात अहिंसेला महत्त्वाचे स्थान दिले होते.

**३) शांततामय, सनदशीर मार्गाची प्रेरणा :-**

गोपाळकृष्ण गोखले यांना गांधीजींनी आपले राजकीय गुरु मानले होते. त्यांच्यापासून गांधीनी सनदशीर चळवळीची आणि शांततामय मार्गाची प्रेरणा घेतली होती. त्यांची राजकीय कार्यपद्धती आणि प्रेरणा या तत्वाला अनुरुप अशीच होती.

**४) श्रमप्रतिष्ठा :-**

जॉन रस्किनच्या 'अन टू द लास्ट' या ग्रंथातून त्यांनी अंत्योदय व सर्वोदय या विचारांची प्रेरणा घेतली. रस्किनच्या या ग्रंथाने माझ्या जीवनाला कलाटणी दिली असे गांधीजी म्हणत त्यातून त्यांनी तीन प्रेरणा घेतल्या.

i) श्रमप्रतिष्ठा-जीवनात श्रमाला महत्त्वाचे स्थान असते. याचे महत्त्व गांधीना पटले.

ii) श्रमाच्यादृष्टीने सर्वांच्या कामाचे सारखे महत्त्व आहे. म्हणजेच कोणतेही काम हलके नाही.

iii) श्रमप्रधान संस्कृतीला महत्त्वाचे स्थान मिळायला पाहिजे. समाजाचे कल्याण व्यक्तीचे भले करुन जाते. सर्वांचे हित ज्यात सामावलेले आहे अशा अर्थव्यवस्थेचा आपण स्वीकार केला पाहिजे. मध्यमवर्ग हा श्रमसंस्कृतीपासून दूर राहतो असे त्यांचे मत होते.

**५) अराज्यवादी विचार :-**

टॉलस्टॉय हा रशियन लेखक शांततामय प्रतिकाराची प्रेरणा त्यांना या रशियन लेखकाकडून मिळाली 'किंगडम ऑफ दि गॉड इज विदिन यू' या टॉलस्टॉयच्या ग्रंथाचा गांधीच्या मनावर सखोल परिणाम झाला. शत्रूवर विजय मिळविण्यासाठी स्नेह व प्रेम यांचा यशस्वी उपयोग करता येतो हे गांधीना टॉलस्टॉयकडून लक्षात आले. इंग्रजी जुलमी राजवटीचा द्वेष न करता प्रेमाने, नम्रतेने, प्रतिकार करण्यासाठी प्रेरणा टॉलस्टॉयच्या अराज्यवादी विचारातून लाभली. असहकाराच्या तत्वाने परिवर्तन घडवून आणण्याची कल्पना प्रत्यक्षात आणावयास त्यांनी सुरुवात केली. शांततापूर्ण प्रतिकार केवळ भारतालाच नाही तर संपुर्ण जगाला उपयुक्त आणि मार्गदर्शक आहे.

**सत्याचे प्रयोग :-**

गांधीजींनी आत्मचरित्राला सत्याचे प्रयोग असे शिर्षक दिले ते सतत प्रयोग करीत. गांधीजींनी सत्याचा प्रयोगात असे स्पष्ट केले आहे की, सत्य एकदम प्रस्थापित होत नाही. प्रयोगातून ते सिद्ध होत असते. म्हणूनच त्यांनी आपल्या विचाराला सत्याचे प्रयोग असे नाव दिले. म्हणून गांधीवाद हा घट्ट बंदिस्त विचार नाही. गांधी म्हणतात, माझ्यानंतर माझ्या विचारांचा कोणताही पंथ मला निर्माण करावयाचा नाह. त्यांच्या विचारात कृतीला त्यांनी प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

**कृतीला प्राधान्य :-**

प्रत्यक्ष कृती हा गांधी विचाराचा मुख्य आधार होता दक्षिण आफ्रिकेत व नंतर भारतात त्यांनी नि:शस्त्र प्रतिकाराचा, सत्याग्रही मार्ग मुक्तीसाठी अनुसरला. आज हा मार्ग सर्व जगातील अनेक देशातील दुर्बल, सर्वसामान्य व वंचितांसाठी सरकारविरुद्धच्या संघर्षात वापरला जातो. गांधीचा विचार जगाने स्वीकारला असे वाटते. गांधी निधनानंतर गांधीवादी विनोबा, जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय, भूदान, ग्रामदान, जीवनदान या विचारांची भर घातली.

**अहिंसा :-**

गांधीवादात अहिंसेला प्राधान्य आहे. अहिंसेतच मानवमुक्तीचा महामार्ग असल्याचे गांधीनी हेरले होते. दुष्टासमोर शरणांगती न पत्करता त्याचे दुष्ट इरादे त्याने बदलावेत यासाठी आत्मबलाचा वापर करणे हा अहिंसेचा खरा अर्थ आहे. त्यामुळे आक्रमक राष्ट्रवाद, साम्राज्यवाद, युद्धे, शस्त्रास्त्र स्पर्धा यांना गांधीवादाचा विरोध आहे.

**१) गांधीजींचे राज्यसंस्थेसंबंधीचे विचार :-**

गांधीजी अराज्यवादी विचारवंत होते. गांधी थोरोच्या विचाराने प्रभावित झाले होते. व्यक्तीस्वातंत्र्य, स्वयंनिर्णयाचा अधिकार गांधींना मान्य होता. त्यांच्यामते तेच सरकार चांगले की, जे कमीत कमी शासन करते. हाच विचार गांधींनी ग्राह्य मानला. राज्यसंस्थेने व्यक्तीजीवनात आक्रमण केले आहे. आजच्या आधुनिक काळात कल्याणकारी राज्याच्या कल्पनेमुळे राज्याचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक बनले आहे. राज्यसंस्था बळाचा वापर करुन सक्ती करणारी संस्था आहे. या संस्थेबद्दल गांधीच्या मनात प्रेम भीती व आस्थाही नव्हती किंवा राज्यसंस्था काही भरीव कार्य करील अशी अपेक्षाही नव्हती. राज्याचा व्यक्तीगत जीवनातील हस्तक्षेप त्यांना मान्य नव्हता. गांधींच्यामते, राज्य हे आत्मा नसलेले यंत्र आहे. त्यामुळे त्याचे स्वरुप हिंसात्मक

राहणार. त्यासाठी त्यांनी राज्यविरहित समाजाची कल्पना मांडली. त्यांची राज्यसंस्थेला विरोध करण्याची कारणे पुढीलप्रमाणे.

**१) शक्ती हा राज्याचा आधार :-** गांधींनी राज्यसंस्थेला विरोध करण्याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यसंस्था ही तीव्र व संघटित स्वरुपातील हिंसाचाराचे प्रतीक असते. हिंसा आणि सत्ता ही तिचे प्रमुख आधार आहेत. लष्कर, पोलीस या यंत्रणेच्या माध्यमातून राज्य शक्तीचा वापर करीत असते. सामान्य जनता कायद्याचे पालन भीतीपोटी करीत असते. ब्रिटीश सत्तेच्या क्रौर्याचा देशवासियावरील अमानुष परिणाम गांधींना दिसत होता. पाशवी बळाच्या जोरावर त्या सत्तेने या देशातील पौरुष व कर्तृत्व खच्ची केले. आणि स्वाभीमान, अस्मिता व स्वातंत्र्याकांक्षा नष्ट केली असे त्यांचे ठाम मत बनले होते. जनतेने राज्याच्या कायद्याचे पालन स्वयंप्रेरणेने आणि स्वेच्छेने केले पाहिजे. जुलूम, जबरदस्तीने कायदापालनाला अर्थ नाही. अशाप्रकारचे कायपालन निर्जीव स्वरुपाचे असते. म्हणून राज्यसंस्था सर्वासाठीच अपायकारक असते. हिंसेला व पाशवी सत्तेला महत्त्व देणारे राज्य नष्ट करुन राज्यविरहित समाज स्थापनेवर गांधीचा विश्वास होता.

**२) राज्याच्या चिरंतन अस्तित्वाला विरोध :-** राज्यसत्तेकडे पाहण्याचा गांधीजींचा दृष्टीकोन मुलत:च संशयाचा होता. त्यामुळे राज्यसंस्था आवश्यक नाही असे त्यांनी प्रतिपादन केले. वास्तविक गांधी आदर्शत: अराज्यवादी होते. म्हणजे राज्यसत्तेचा संपूर्ण अभाव असलेली समाजरचना ही त्यांना आदर्श समाजरचना वाटते. पण मानवी स्वभावातील काही दौर्बल्ये व उणिवा या कारणांनी तो आदर्श समाजात प्रत्यक्षात उतरवणे शक्य होत नाही याची जाणीव गांधींजी होती. म्हणून ते तडजोडीस तयार होतात. काही काळापर्यंत राज्याची आवश्यकता गांधीजी मान्य केली होती. परंतु राज्य दिर्घकाळ टिकून राहण्यास त्यांनी विरोध केला. म्हणजे मर्यादित राज्य सत्तेच्या अस्तित्वाला ते मान्यता देतात. एकदा अहिंसेच्या आधारावर समाज उभा राहिल्यानंतर राज्याची आवश्यकता राहणार नाही. जोपर्यंत असा समाज निर्माण होत नाही तो पर्यंत राज्याची आवश्यकता राहील हे त्यांनी मान्य केले होते.

गांधीच्या विचारांचे मुख्य आधार नैतिक आणि धार्मिक मुल्ये होती. समाज नैतिकतेच्या पायावर उभा राहिल तेव्हा सद्वर्तन हा समाजाचा आधार होईल. अशा समाजात प्रत्येक व्यक्ती स्वयंशासित असेल. राजकीय शक्तीऐवजी नैतिक शक्ती काम करु लागल्यानंतर राज्याची आवश्यकता राहणार नाही. नीतीमत्ता आणि सद्वर्तनी समाज निर्माण झाल्यास दंडसत्तेची गरज भासणार नाही. राज्यसंस्थेच्या

दिर्घकाळ अस्तित्त्वात किंवा राज्याच्या चिरंतन अस्तित्त्वाला गांधींनी विरोध केला.

**३) व्यक्तीचे अस्तित्व नष्ट होते :-** राज्यसंस्था व्यक्तीच्या अधिकारात बाधा आणते असे त्यांचे मत होते. व्यक्तीला आत्मा असतो. राज्य हे आत्मा नसलेले एक यंत्र आहे. राज्य अहिंसक राहणार नाही. उलट राज्यसंस्था सातत्याने आपले वर्चस्व वाढविण्याच्या प्रयत्नात असते. त्यामुळे व्यक्तीला राज्यात स्थान नसते. व्यक्तीचा विकास खुंटतो. राज्यात काही मूठभर लोकांच्या हाती सत्ता केंद्रीत होते. सर्वसामान्य व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आणि हक्कावर आक्रमण होते. आधुनिक काळात राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक बनल्याने व्यक्तीस्वातंत्र्य संकुचित बनले. व्यक्तींच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होतो. जेव्हा व्यक्ती एखादे कार्य स्वेच्छेने करते तेव्हा ते नैतिक स्वरुपाचे असते. राज्य सतत आज्ञा देत असल्यामुळे व्यक्तीच्या स्वेच्छेचा प्रश्नच येत नाही. अशावेळी कोणतेही कार्य जबरदस्तीने केले तर ते आत्मीयतेच्या भावनेतून होत नसल्यामुळे केवळ त्यात औपचारिकता शिल्लक राहते.

**४) व्यक्ती साध्य राज्य साधन :-** गांधीच्यामते राज्यसत्ता हे केवळ एक साधन असते. याउलट व्यक्ती हे साध्य असते. याभूमिकांची उलटापालट कधीही होता कामा नये. व्यक्तीच्या सभोवती असलेल्या सर्व संस्था तिच्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी कितपत आवश्यक आहेत यावर त्यांचे महत्त्व अवलंबून असते. व्यक्ती प्रतिष्ठेला मध्यवर्ती महत्व देणाऱ्या लोकशाहीचाच गांधींनी पुरस्कार केल्याचे दिसून येते.

**५) राजाज्ञेस विरोध करण्याचा जनतेला अधिकार :-** व्यक्तीच्या ठिकाणी राज्यसत्तेला विरोध करण्याचा हक्क गांधीच्यामते उपजतच असतो. राज्यसत्ता नैतिकतेच्या विसंगत असे एखादे कृत्य करीत आहे. अशी व्यक्तीची जेव्हा खात्री होते तेव्हा त्या कृत्याच्या विरोधात उभे राहणे हा व्यक्तीचा हक्क आणि कर्तव्यही ठरते. राजसत्तेचे पालन करण्यामागे जी धारणा असते तीच राजाज्ञेस विरोध करण्यामागेही असते. सद्‌सद्‌विवेकाला न पटणाऱ्या अन्याय कायद्याचे पालन करणे ही शुद्ध गुलामगिरी आहे असे गांधीना वाटते. त्यामुळे अन्यायी राजसत्तेला विरोध करण्याचा जनतेला अधिकार आहे.

**६) जनतेचे सार्वभौमत्व :-** सार्वभौमत्व हे नेहमी जनतेच्या ठिकाणी असते. जनता हीच खऱ्या अर्थाने संपूर्ण राजकीय सत्तेचा मूलस्त्रोत असते असे गांधीचे प्रतिपादन होते. राज्याचा आधार केवळ प्रभुशक्ती किंवा जनतेने केलेले निमुट आज्ञापालन हा नसून व्यक्तीने तिला उस्फूर्तपणे केलेले सहकार्य हाच असतो. सरकार कितीही प्रबळ व बलशाली असले तरी शासिताच्या संमतीवाचून ते सत्ता

घालवू शकत नाहीत. राज्यसत्तेचे सार्वभौमत्व अमर्याद व निरंकुश असते हा विचार गांधींना मान्य नव्हता.

**७) राज्यविहिन समाजाच्या रचनेची आवश्यकता :-** गांधीजींच्यामते राज्य ही एक आपत्ती आहे. मानवी स्वभावातील दोषामुळे राज्यसंस्थेची निर्मिती झाली. असे शक्तीवर आधारलेले राज्य लवकरात लवकर नष्ट होणे व्यक्तीविकास आणि व्यक्ती स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे, जेंव्हा व्यक्तीचा नैतिक विकासपूर्ण होऊन अहिंसेच्या आधारावर समाजरचना होईल तेव्हा राज्याची आवश्यकता राहणार नाही. महात्मा गांधींचा विचार नैतिकतेवर आधारित असल्यामुळे पाश्चात्य अराज्यवाद्यांची कल्पना त्यांना मान्य नव्हती.

व्यक्तीचे हक्क सुरक्षित राहणे, कायदा आणि नीतीमत्ता यांची क्षेत्रे स्पष्टपणे वेगळी ठेवली जाणे, राज्यसंस्थेचे साधनमूल्य सतत लक्षात ठेवणे आणि व्यक्तीला अंगभूतपणे असलेल्या सविनय प्रतिकाराच्या हक्काचे जतन करणे या गोष्टी राज्य सत्ता मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने गांधीजींना महत्त्वपूर्ण वाटत होत्या. राज्यसत्ता ही व्यक्तीच्या हक्काची निर्माती नसल्यामुळे तिला ते हक्क हिरावून घेण्याचा मुळीच हक्क नाही. व्यक्तीचे हक्क आणि कर्तव्य निसर्गसिद्ध असतात अशी गांधींची भूमिका होती. राज्य सत्ता ही मूळातच पाशवी शक्तीचे प्रतीक आहे. तेव्हा तिच्या हातून शक्तीचा गैरवापर होण्याची शक्यता नेहमीच असते. अशावेळी जनतेने काय करावे याचा सविस्तर विचार गांधींनी केला होता.

**टीका :-**

गांधीजींच्या राज्यसंस्थेसंबंधीच्या विचारावर पुढील प्रमाणे टीका करण्यात आली.

**१) राज्य नैसर्गिक आहे :-**

गांधीच्या राज्यसंस्थेसंबंधी विचारावर पहिला आक्षेप असा घेण्यात आला की, राज्य एक अत्यावश्यक आणि नैसर्गिक संस्था आहे. वास्तविक मनुष्याच्या गरजेतून राज्याची निर्मिती झाली आहे. मनुष्य जीवनाच्या अस्तित्वासाठी राज्याची गरज आहे. राज्याशिवाय मनुष्याला जीवन जगणे कठीण आहे. राज्य नसेल तर समाजात अराजकता, गोंधळ आणि अंदाधुंदी निर्माण होईल. बळी तो कान पिळी हा रानटी नियम पुन्हा अस्तित्वात येईल. त्यामुळे राज्य एक आवश्यक संस्था आहे.

**२) शांतता आणि सुव्यवस्थेसाठी :-**

समाजात शांतता आणि सुव्यवस्थेसाठी राज्याची आवश्यकता आहे हे

गांधीनीही मान्य केले होते. परंतु अहिंसात्मक समाजाची निर्मिती झाल्यावर राज्याची आवश्यकता राहणार नाही असा त्यांचा विश्वास होता. पण गांधीना ज्या प्रकारच्या मनुष्यस्वभावाची अपेक्षा होती तसा तो नाही. त्यांचा मनुष्याकडे पाहण्याचा एक विशिष्ट दृष्टीकोन होता. परंतु मनुष्य अपरिपूर्ण आहे. त्याची ही अपरिपूर्णता कधीच संपणार नाही. तेंव्हा मनुष्यातील पशुत्व रोखण्याचे कार्य राज्य करीत असते. म्हणूनच समाजात शांतता आणि सुव्यवस्था टिकून राहते. गांधीजी काही काळासाठी राज्याचे अस्तित्व मान्य करतात पण हा काळ कधीच न संपणारा असल्यामुळे राज्याचे अस्तित्व नेहमीसाठीच आवश्यक ठरले आहे.

**३) व्यवहारिक दृष्टीकोनाचा अभाव :-**

गांधीचे राज्यसंस्थेसंबंधीचे विचार अव्यावहारिक स्वरुपाचे वाटतात. वास्तविक गांधीचा दृष्टीकोन हा आदर्शवादी स्वरुपचा आहे. राज्यविरहित समाजाची कल्पना अशक्य असून ती कल्पनेतच ठीक वाटते. याशिवाय गांधींच्या मनुष्याविषयीच्या नैतिकतेच्या अपेक्षा ही अंत्यत उच्च दर्जाच्या होत्या. इतकी उच्च नैतिक पातळी सर्वसामान्य माणूस गाठू शकेल असे वाटत नाही. त्यांनी सामान्य माणसाकडून अवास्तव अपेक्षा ठेवल्या त्या प्रत्यक्षात उतरणे असंभव आहे.

**४) व्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी :-**

खरेतर व्यक्तीस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी राज्यसंस्थेची आवश्यकता असते. याउलट गांधींचे असे मत होते की, राज्यामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य धोक्यात येते. परंतु काळाने हे सिद्ध केले आहे की, राज्यातच व्यक्तीचा विकास होतो. देशाचे संविधान हे व्यक्तीच्या अधिकाराचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करीत असते. त्यामुळे राज्यामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित होते असे म्हणणे योग्य वाटत नाही.

गांधीजींचे राज्यसंस्थेसंबंधी विचार हे आदर्श स्वरुपाचे होते. एक आदर्श मूल्य म्हणून त्याचा स्वीकार करणे निश्चितच योग्य आहे. कारण कल्याणकारी राज्याच्या व्यापकतेमुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा पडलेल्या आहेत हे आपल्याला मान्य करावेच लागेल. जे शासन कमीत कमी कायदे करते ते चांगले सरकार असते हा ही मुद्दा पटण्यासारखा आहे. परंतु व्यवहार आणि वास्तविकता याला विसरुन चालत नाही. कारण काही कामे अशी असतात की ती राज्यानेच करणे आवश्यक असते. त्यामुळे राज्याचे महत्व नाकारुन चालत नाही. मनुष्य स्वभाव स्वार्थी, भांडखोर असल्यामुळे त्याच्या नियंत्रणासाठी राज्याच्या दंडसत्तेची आवश्यकता असते. अशी शक्ती केवळ राज्याकडेच असते. त्यामुळे राज्यसंस्थेचे महत्त्व नाकारुन चालणार

नाही. आधुनिक काळात राज्यसंस्था अधिकाधिक मजबूत होताना दिसत आहे. साम्यवादी सोव्हिएट रशिया कोसळला परंतु तेथील राज्ये कायम टिकून आहेत. त्यामुळे गांधींचे राज्य संस्थेसंबंधीचे विचार अव्यवहार्य स्वरुपाचे आहेत.

**२) गांधीचे सत्य व अहिंसेसंबंधी विचार :-**

गांधीच्या समग्र विचारात सत्य व अहिंसेला अनन्यसाधाराण महत्व आहे. किंबहुना सत्य आणि अहिंसेचा अन्योन्यमिश्रित संबंध आहे. सत्यापर्यंत पोहोचण्याचे अहिंसा एक माध्यम आहे.

सत्य व अहिंसेचा पुजारी असे गांधीचे वर्णन केले जाते. गांधींना जागतिक किर्ती प्राप्त झाली. कारण गांधी सोडून कोणत्याही अन्य नेत्याने स्वातंत्र्यलढ्यात सत्य व अहिंसा या मुल्यांचा आग्रह धरलेला आढळून येत नाही.

गांधीजी सत्य म्हणजे परमेश्वर असे मानत. व्यक्तीला जे सत्य वाटते ते सापेक्ष असते. परमेश्वर म्हणजे व्यक्तीनिरपेक्ष सत्य सत्याचा शोध म्हणजे परमेश्वराची प्राप्ती होय. सत्याचा शोध माणसाने अखंडपणे चालू ठेवला पाहिजे. व्यक्तीची आणि समाजाची प्रगती होण्यासाठी सत्य व अहिंसा या तत्वांचा स्वीकार केला पाहिजे. त्यासाठी सत्याचे सदैव पालन केले पाहिजे. प्रसंगी प्राण देण्याची तयारी ठेवली पाहिजे. आपले विचार आणि कृती सत्यावर आधारित असले तरच त्यात विसंगती राहणार नाही. गांधी सत्य आणि अहिंसा यात फरक करीत नसत. सत्याच्या आधारेच जीवनात अहिंसा रुजविता येते असे गांधींचे ठाम प्रतिपादन होते. त्यासाठी धैर्य, त्याग आणि नीतीची गरज असते.

अहिंसा हे तत्व भारतीयांसाठी नवीन नाही. बौद्ध, जैन, लिंगायत यासर्व धर्मांनी फार प्राचीन काळापासून हिंसावर्ज्य मानली आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हे तत्व भारतीयांना फार पूर्वीपासून मान्य व प्रिय आहे. गांधींनी अहिंसा या मूल्याला राजकारणात व समाजकारणात आणले हे महात्मा गांधींचे खास वैशिष्ट्य होय.

**३) अहिंसेचा अर्थ :-**

(अहिंसा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव इतका संकुचित अर्थ गांधींना मान्य नाही राग, लोभ, स्वार्थ, याद्वारे इतरांना शारीरिक किंवा मानसिक दुखापत न करणे म्हणजे अहिंसा होय. आपल्या बोलण्याने आचरणाने कोणालाही दुःख किंवा त्रास होऊ नये हा अहिंसेचा खरा मार्ग होय. हिंसेला, मनातही थारा मिळता कामा नये किंवा आपल्या मनामध्ये एखाद्याबद्दल असूयेची भावना येणे देखील हिंसा होय. केवळ

समाज भयामुळे वा संधी मिळत नाही म्हणून अहिंसा आचरणे गांधींना पुरेसे वाटत नाही. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अहिंसा महत्त्वाची ठरते.

क्रोधाला प्रेमाने, हिंसेला अहिंसेने, अपकाराला उपकाराने, शत्रूला मित्रत्वाने उत्तर देणे म्हणजे अहिंसा होय. गांधीजींच्या अहिंसेत राग, लोभ, क्रोध, मोह, मत्सर, हेवा अशा हिंसक बाबींना स्थान नाही. दुष्टासमोर शरणांगती न पत्करता त्याचे दुष्ट इरादे त्याने बदलावेत यासाठी आत्मबलाचा वापर करणे असा गांधींना अहिंसेचा अर्थ अभिप्रेत होता. याचा अर्थ सामाजिक व राजकीय जीवनात सूड, हिंसा, प्रतिकार, राग, रक्तपात यांना स्थान नाही.

लोकांची लुबाडणूक, फसवणूक मारामारी, जखमी करणे, लुटणे यासर्व बाबी हिंसेत मोडतात. बौद्धीक व नैतिक गैरवर्तन म्हणजेही हिंसाच होय असे गांधीचे मत होते. या सर्वांपासून परावृत्त होणे म्हणजे अहिंसेचा मार्ग होय. हा गुण प्रत्येकाने जोपासला पाहिजे, वाढविला पाहिजे. सत्य व अहिंसा म्हणजे मानवी जीवनात शांतता, सात्विकता, प्रेम, आनंद यांचे राज्य होय. प्रेमाची भावना हे दुसरे रुप होय. स्वत:च्या दु:खाची पर्वा न करता दुसऱ्याच्या सुखासाठी प्रयत्न करणे ही खरी अहिंसा होय.

गांधीजींची अहिंसेची ही नैतिक कल्पना आहे. व्यवहारवादी भूमिकेतून ती सांगितली नाही. सत्य व अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून सत्याची साधना करण्यासाठी अहिंसेचा मार्ग स्वीकारावा लागतो; असा गांधींचा आग्रह होता.

**२) अहिंसेचे प्रकार :-**

महात्मा गांधीच्यामते अहिंसा तीन प्रकारची असते. १) भित्र्या व्यक्तीची अहिंसा, २) दुर्बलांची अहिंसा, ३) शक्तीशाली व्यक्तीची अहिंसा.

**१) भित्र्या व्यक्तीची अहिंसा :-** गांधीच्या मते, अग्नी व पाणी जसे एकत्र राहू शकत नाही त्याप्रमाणे अहिंसा व भेकडपणा एकत्र नांदू शकत नाही. व्यक्तीमध्ये जेव्हा परिस्थितीचा सामना करण्याचे धैर्य नसते तेव्हा ती व्यक्ती घाबरुन अहिंसेचा आश्रय घेते. शरणांगती पत्करते. गांधीच्यामते अशा भ्याडपणापेक्षा हिंसा बरी.

**२) दुर्बलांची हिंसा :-** अहिंसेचा दुसरा प्रकार एखाद्या विशिष्ट प्रसंगी उपयुक्त म्हणून ही अहिंसा स्वीकारली जाते. एखाद्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी एक साधन म्हणून अशा अहिंसेचा स्वीकार केला जातो. अहिंसा हे धोरण मानले जाते. ही दुर्बलांची अहिंसा होय. किंवा स्वत:मधील दुर्बलतेमुळे अशी अहिंसा नाईलाजाने स्वीकारावी लागते. अशी अहिंसा स्वीकारण्यात कोणत्याही प्रकारची नैतिकता

... स्वीकारलेली अहिंसा ही अशक्तांची, दुर्बलांची अहिंसा असे गांधी सांगतात.

**३) शक्तीशाली व्यक्तीची अहिंसा :-** अहिंसेचा अत्युच्च प्रकार म्हणजे शूरांची अहिंसा शक्तीशाली व्यक्ती किंवा शूरांची अहिंसा ही प्रचंड आत्मविश्वास व उच्च नैतिकता यावर आधारित असते. सामाजिक व राजकीय जीवनात अशाप्रकारची अहिंसा सर्वोत्कृष्ट स्वरुपाची मानली जाते. हिंसा करण्याची शारीरिक आणि मानसिक क्षमता असून देखील अहिंसेचा स्वीकार करण्यात येतो. यासाठी जबरदस्त मनोबल लागते. (सर्वसामान्य लोकांच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट असल्यामुळेच गांधींनी तिला वीरांची अहिंसा म्हटलेले आहे.) वीर पुरुषांच्या अहिंसेत आक्रमण करण्याचे सामर्थ्य असते पण आक्रमणाची इच्छा नसते. वीर पुरुषांनी तत्व म्हणून अहिंसेचा स्वीकार केलेला असल्याने तिला श्रेष्ठत्व प्राप्त होते. अहिंसेचा स्वीकार स्वेच्छेने केलेला असतो, सक्तीने नाही. विनम्रता आणि धैर्य अहिंसेसाठी आवश्यक असते. अहिसा ही त्याची जीवनपद्धती असते. ती निरपवादपणे अहिंसा स्वीकारतो. त्याच्या अहिंसेत फारमोठे मनोबल, पर्वत हलविण्याचे सामर्थ्य असते.

**३) गांधीची अहिंसा व्यवहारवादी :-** वास्तविक पूर्ण अहिंसेच्या मार्गाने मार्गक्रमण करणे अंत्यत कठीण असते. कारण इतकी उच्च नैतिकपातळी मनुष्य गाठू शकत नाही. मनुष्य जीवनात थोडीफार हिंसा करीत असतो. अहिंसेबद्दल गांधीजींचे विचार पूर्णपणे व्यवहारवादी होते. कारण जेव्हा काश्मीरवर पाकिस्तान सैन्याने आक्रमण केले. काश्मीरी जनतेला वाचविण्यासाठी भारताने सैन्य पाठवावे का? याप्रश्नासंबंधी मंत्रीमंडळाने सैन्य पाठविण्याचा निर्णय घेतला होता. परंतु गांधीजींची अनुमती घ्यावी म्हणून त्यांच्याकडे दुत पाठविण्यात आला. सैन्य पाठवावे का? या प्रश्नाला गांधींनी उलट प्रश्न केला की, मग सैन्य असते तरी कशासाठी? म्हणजे आपल्या प्राणाचे रक्षण करण्यासाठी किंवा आपले अस्तित्व टिकविण्यासाठी पुष्कळदा हिंसा करावी लागते आणि तसे करणे स्वाभाविक आहे. हे गांधीजींना मान्य होते.

अहिंसेचे आचरण करायचे तर संरक्षणाचे काय? असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. त्याचेही उत्तर गांधीनी दिले आहे. आत्मिक प्रतिकाराचा मार्ग आचरुन व्यक्ती राष्ट्रांतर्गत छळ शोषणापासून किंवा राष्ट्रे बाह्य आक्रमणापासून स्वत:चा बचाव करु शकतात. असा विश्वास त्यांना वाटतो. गांधीच्यामते आत्मसंरक्षणार्थ वापरावयाची अहिंसा तीन प्रकाची असते. १) संघटित अधिसत्तेविरुद्ध वापरावयाची

अहिंसा २) अंतर्गत यादवी व उठावाच्या प्रसंगी वापरावयाची अहिंसा आणि ३) बाह्य आक्रमणाविरुद्ध उपयोगात आणावयाची अहिंसा, अहिंसेची शक्ती बाहेरुन दिसत नाही. परंतु ती हिंसेपेक्षा बलवान असते. हिंसक युद्धाला जशी पूर्वतयारीची गरज असते. तशीच अहिंसक मार्गाने बचाव करण्यासाठीही पूर्वतयारी करावीच लागते संपूर्ण देशाचे आर्थिक, सामाजिक जीवन सुरळीत करणे, रचनात्मक मार्गांनी सामाजिक संबंध सुधारणे आणि निग्रह, सोशिकता वगैरे गुणांची जोपासना करणे असे या पूर्वतयारीचे स्वरुप असते. ही पूर्वतयारी झाल्यानंतर अहिंसक सत्याग्रहींना कोणत्याही प्रकारचे शस्त्रबळ नमवू शकत नाही असा गांधीजींचा विश्वास होता. अहिंसक प्रतिकाराखेरीज आजची शस्त्रास्त्रस्पर्धा व हिंसाचार यांचा अंत घडवून आणण्याचा दुसरा कोणताच मार्ग गांधींच्यामते अस्तित्वात नाही. अहिसेतच मानवमात्राचे भवितव्य सामावलेले आहे.

सैध्दांतिक पातळीवर अहिंसा हेच सर्वश्रेष्ठ अस्त्र असले तरी ते प्रत्येकालाच पेलेल असेही नाही. निष्कलंक चारित्र्य, स्वेच्छापूर्वक स्वीकारलेले दारिद्र्य, सत्यनिर्भयतावादी गुण, साधेपणा, श्रमवृत्ती, दलितांविषयी सेवाभाव वगैरे गोष्टी ज्यांनी खडतर तपश्चर्या करुन संपादन केल्या असतील तेच या शस्त्राचा समर्थपणे वापर करु शकतात असा इशारा गांधींनी दिला आहे.

**३) गांधीजींचे सत्याग्रहासंबंधी विचार :-**

सत्याग्रह म्हटंले की, गांधीजी आठवतात. गांधी आणि सत्याग्रह हे जणू समानार्थी शब्द आहेत. सत्याग्रह ही संकल्पना गांधीची संपूर्ण जगाला दिलेली अपूर्व देणगी आहे. सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेत त्यांना सत्याग्रहाची कल्पना सुचली. राजकीय विचार आणि व्यवहाराचा समन्वय म्हणजे सत्याग्रहाचा विचार होय. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह धरणे होय. सत्याग्रहात प्रतिपक्षावर हिंसा करता येत नाही. त्यात सत्याला संरक्षण द्यावे लागते. स्वत: यातना सहन करुन प्रतिपक्षाचे अंत:करण बदलावे लागते. सत्याग्रहाचा विचार तसा जुनाच आहे. पूर्वी सामाजिक जीवनात त्याचा प्रयोग केला जात असे. परंतु गांधीजींनी मात्र त्याला राजकारणाच्या व्यापक पातळीवर अधिष्ठान मिळवून दिले. राजकीय पातळीवरील होणारे अन्याय, अत्याचार, जुलूम याविरुद्ध उभारलेला लढा म्हणजे सत्याग्रह होय. दुबळ्या जनतेत शक्ती, प्रेरणा देण्याचे कार्य सत्याग्रह करीत असते. अपप्रवृत्तीवर विजय मिळविण्याचे एक प्रभावी साधन होय. त्यासाठी आत्मक्लेष सहन करण्याची मनाची तयारी असावी लागते.

सत्याग्रह आणि नि:शस्त्र प्रतिकार ही दोन्ही तत्वे समान वाटतात. पण यादोन्हीमध्ये अंतर आहे.

नि:शस्त्र प्रतिकार राजकीय स्वरुपाचे शस्त्र आहे तर सत्याग्रह हे नैतिक शस्त्र आहे.

नि:शस्त्र प्रतिकार दुर्बलांचे शस्त्र आहे, सत्याग्रह सामर्थ्यवानांचे शस्त्र आहे.

नि:शस्त्र प्रतिकाराचा संबंध शारीरिक घटकाशी असतो. सत्याग्रह हृदयाला स्पर्श करते, त्यात हृदयपरिवर्तनाची शक्ती असते. म्हणून सत्याग्रह नि:शस्त्र प्रतिकारापेक्षा श्रेष्ठ आहे.

नि:शस्त्र प्रतिकारात प्रेमाची भावना असण्याची गरज नसते. सत्याग्रहात तशी भावना आवश्यक आहे.

नि:शस्त्र प्रतिकार विरोधकाला त्रास देवून वटणीवर आणण्याचा प्रयत्न करतो. सत्याग्रहाजवळ न मारता मारण्याचे धैर्य असते.

नि:शस्त्र प्रतिकार स्थिर असतो. सत्याग्रह गतीशील असतो.

नि:शस्त्र प्रतिकारात अनिच्छेने दु:ख सहन करावे लागते. सत्याग्रहात व्यक्ती स्वखुशीने दु:ख सहन करतो.

सत्याग्रहाचा सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी उपयोग केला जातो. सत्याग्रहीला मृत्यू आला तर तो देखील शेवटी त्याचा विजयच ठरतो. येशू ख्रिस्त आणि सॉक्रेटिसच्या उदाहरणातून आपल्याला हेच दिसून येते. त्यांच्या मृत्यूनंतर हजारो लोकांना त्यांचे तत्वज्ञान पटले आणि त्यांनी दाखविलेल्य मार्गाचा त्यांनी स्वीकार केला.

सत्याग्रहासंबंधी महात्मा गांधींनी प्रथम सत्याचा अर्थ स्पष्ट करुन सांगितला. त्याचबरोबरच सत्याग्रहींची वैशिष्ट्ये सत्याग्रहाची साधने, साध्य आणि साधनसुचिता याचाही त्यांनी विचार केला. आचरणाच्या शुद्धतेसाठी त्यांनी सत्य आणि अहिंसेच्या पालनावर भर दिला.

**सत्य :-**

सत्य आणि अहिंसा या परस्परपूरक बाबी आहेत. सत्यावाचून अहिंसा आणि अहिसेशिवाय सत्याची कल्पना करता येत नाही. दोन्ही एकाच नाण्याच्या दोन वाजू आहेत. गांर्धीनी सापेक्ष सत्य आणि निरपेक्ष सत्य असे दोन प्रकार सांगितले आहेत. व्यक्तीनुसार आणि परिस्थितीनुसार जर सत्याचे स्वरुप बदलत असेल तर त्याला गांधीनी सापेक्ष सत्य म्हटले आहे. असे सत्य पूर्ण सत्य असू शकत नाही.

सापेक्ष सत्याच्या साह्याने निरपेक्ष सत्याकडे जाता येते. निरपेक्ष सत्य म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीच प्राप्ती होय. सर्वसामान्यांना सापेक्ष सत्य अभिप्रेत असते. त्यामुळे ते पूर्णत्वाला जाऊ शकत नाही. निरपेक्ष सत्य हे शाश्वत असते. त्याच्या ठिकाणी सतचित् आणि आनंद यांचा मेळ असतो. निरपेक्ष सत्य श्रेष्ठ असते. विश्वासघात द्वेष असेल तर निरपेक्ष सत्याकडे जाता येत नाही. गांधींना सत्यासाठी तडजोड मान्य नव्हती. त्यासाठी वाटेल ती किंमत मोजण्याची तयारी असावी लागते. सत्य आणि कृती यांचा समन्वय साधता आला पाहिजे. जीवनात पूर्णपणे अहिंसेचा स्वीकार करुन ध्यैर्य, त्याग आणि नैतिकता याच्या बळावर सत्याच्या मार्गाने जाता येते. सत्य म्हणजे सर्वोच्च प्रेम, सर्वोच्च दया, करुणा आणि सर्वोच्च आत्मबलिदान होय. प्रल्हाद, सॉक्रेटिस, येशूख्रिस्त यांनी सत्यासाठीच बलिदान दिले हा इतिहास सर्वश्रूत आहे. सत्य ही अंतरात्म्याची शक्ती होय. गांधीजी सत्यासाठी अहिंसेचा देखील त्याग करायला तयार होते. इतके महत्व त्यांनी सत्याला दिले होते.

**सत्याग्रहाची वैशिष्ट्ये :-**

सत्याग्रही कसा असावा याचेही स्पष्टीकरण गांधीजी देतात. जुलमी परिस्थिती बदलण्यासाठी शांततेच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे. हिसा किंवा बळाचा मार्ग गांधींना मान्य नव्हता. प्रतिपक्षाचे हृद्रय परिवर्तन करण्याची क्षमता सत्याग्रहात आहे. पण सत्याग्रहाच्या माध्यमातून बदल घडून आला नाही तर हिंसेच्या मार्गाचा स्वीकार करावा का? यावर गांधीजी म्हणतात. बलप्रयोग करणे बरोबर नाही. अपेक्षित बदल घडून येत नसेल तर त्याचा अर्थ सत्याग्रहींचे सामर्थ्य कुठेतरी कमी पडते. अशावेळी सत्याग्रहींनी आपले सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी जास्तीत जास्त शुद्ध आणि दोषरहित बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सत्याग्रहीसाठी गांधींनी काही नियम सांगितले आहेत.

सत्याग्रहींची ईश्वरावर श्रद्धा असावी. त्यामुळे विरोधकांचा त्रास सहन करण्याची शक्ती प्राप्त होते.

संपत्ती आणि प्रसिद्धीची हाव नसावी.

आरोग्य उत्तम असावे.

तो भित्रा नसावा, ध्येयनिष्ठ असावा.

द्वेष, क्रोध, घृणा, लोभ, मोह याच्या आहारी जावू नये.

स्वार्थासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारु नये.

विरोधकांबद्दल त्याच्या मनात प्रेम आणि आदर असावा.

लाचारीची तडजोड करु नये.

शत्रू संकटात असेल तेव्हा सत्याग्रह करु नये.

अशाप्रकारे गांधींनी शुद्ध आचरणाचे नियम सांगितले असून कसल्याही परिस्थितीत हिंसेच्या मार्गाचा स्वीकार करु नये. हिंसेला प्रेमानेच जिंकले पाहिजे. प्रथम अन्यायाविरुद्ध इतर सर्व मार्गाचा उपयोग केल्यानंतर शेवटी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला पाहिजे कारण हा प्रत्यक्ष कृतीचा प्रभावी मार्ग असतो.

**सत्याग्रहाची साधने :-**

सत्याग्रह करावयाचा म्हणजे काय करावयाचे तेही गांधींनी वेळोवेळी सांगितले आहे. परिस्थितीनुसार साधन निवडावे लागेल. सत्याग्रहाची साधने पुढीलप्रमाणे.

**१) असहकार :-**

असहकार म्हणजे सहकार्य करण्यास नकार देणे. वाईट गोष्टींशी असहकार करणे हे व्यक्तीने आपले कर्तव्य मानले पाहिजे. असहकाराच्या साह्याने वाईट गोष्टी नष्ट केल्या जाऊ शकतात. अन्याय, अत्याचार होत असेल तेथे व्यक्तीने त्यांना सहकार्य देण्याचे बंद केले पाहिजे. ज्यांच्यावर अन्याय होतो ते भीतीने किंवा अज्ञानामुळे त्याला प्रतिकार करीत नाहीत. शोषिताने सहकार्य नाकरले की शोषण थांबु शकते म्हणून गांधीच्यामते, अन्याय, अत्याचार, शोषण हे शोषितांच्या इच्छेप्रमाणे किंवा इच्छा नसताना सहकार्य देण्याचा परिणाम आहे. लोक सहकार्य करतात म्हणून शोषण होते. अशावेळी जनतेने असहकार केला तर अशा प्रवृत्तीला आपोआप आळा बसतो.

शोषण हे दोन प्रकारचे असते. एक व्यक्तीने व्यक्तीचे केलेले शोषण आणि दुसरे म्हणजे सरकारने व्यक्तीचे केलेले शोषण. शासन व्यक्तीवर व लोकसमुहावर अन्याय करते. त्यासाठी सत्याग्रही मार्ग म्हणजे असहकाराचा. समजा सरकारने जाचक कर लावला तर तो न देणे म्हणजे सरकारशी असहकार पुकारणेच होय. कारण जनइच्छेशिवाय आणि त्यांच्या संमतीशिवाय सरकारला काम करणे कठीण असते. जनतेच्या सहकार्यावरच सरकारची सत्ता टिकून राहते म्हणून असहकाराच्या मार्गाने सरकारच्या दडपशाहीतून जनतेला मुक्त करता येते.

सरकार अस्तित्वात नाही असे समजून लोक चालू लागले, पूर्ण असहकार जाहीर केला तर सरकार कोसळून पडते. जनता सहकार्य करते म्हणून सरकार चालते. असहकार म्हणजे मान्यता काढून घेणे. तसेच घरात आईने जर असहकार आंदोलन पुकारले. तिने काम करणे बंद केले तर काय अवस्था होईल याची कल्पना

करा. गांधी म्हणत की, असहकारामागे सुद्धा शुद्ध भावना असावी जेणेकरुन सरकार सुधारावे शोषण थांबावे थोडक्यात जनतेने जर निरंकुश सत्तेला भ्यायचे सोडले आणि असहकारचा मार्ग स्वीकारला तर निरकुश सत्तेची समाप्ती झाल्याशिवाय राहात नाही.

**असहकाराचे मार्ग :-**

**i) सविनय कायदेभंग :-** सविनय कायदेभंग हा सत्याग्रही असहकारांचा एक भाग आहे. अमूक एक कायदा अन्यायकारक आहे मला तो मान्य नाही. तो कायदा मी मुकाट्याने सहन करणार नाही. त्यासाठी सरकारला आधी पूर्वसूचना देवून नम्रपणे तो कायदा मोडणार शिक्षा स्वीकारणार यालाच सविनय कायदेभंग म्हणतात. म्हणजेच अहिंसात्मक मार्गानेच कायदेभंग करावा यावर गांधीजींचा संपूर्ण भर होता.

(समाजहिताकडे सरकारचे दुर्लक्ष होत असेल तर सविनच कायदेभंगाचा मार्ग अनुसरावा, अन्यायी आणि जुलमी कायद्याला विरोध झाला पाहिजे. त्याबदल्यात शिक्षा झाली तर भोगली पाहिजे. सर्व उपाय संपल्यानंतर सविनय कायदेभंगांचा मार्ग अंगिकारावा हा मार्ग अहिंसात्मक असावा. हिंसाचार होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

सविनय कायदेभंगाचे वैशिष्ट्य म्हणजे या मार्गाने बदल घडवून आणताना त्यात रक्तपाताची शक्यता नसते, या मार्गाचा अवलंब करताना एकच पथ्य पाळण्याची आवश्यकता असते. की, कायदेभंगाचे आंदोलन शांततामय मार्गाने व्हावे, व्यक्ती नैतिकदृष्ट्या सुदृढ असावी, संयम आणि शिस्त हे गुण तिच्या अंगी असावे लागतात. सविनय कायदेभंग एखाद्या विशिष्ट कायद्याच्या बाबतीत असेल तर तो कायदा वगळून इतर कायद्याचे पालन सत्याग्रहींनी केले पाहिजे.

सविनय कायदेभंगाचे अनेक हेतू असू शकतात. जसे एखादा कायदा सरकारने मागे घ्यावा, जुलमी धोरण सरकारने मागे घ्यावे यासाठी कायदेभंगाचे आंदोलन करता येते. परंतु याकायद्याचा आधार नैतिकता हाच असावा परकीय सत्तेच्या हाती राजकीय सत्ता असेल तर कायदेभंगाचे प्रसंग येतात. लोकशाही शासनपद्धतीत सत्ता जनतेच्या हाती असल्यामुळे कायदेभंगाची वेळ येत नाही. अन्यायकारक कायदे संमत होत असतील तर गांधीजींनी असहकार आणि कायदेभंगाची अनुमती दिली आहे. कायदेभंग करताना सत्ताधाऱ्याकडून होणारे अत्याचार सहन करण्याची तयारी जनतेची असली पाहिजे उदा. १९३०-३१ च्या सुमारास गांधीजींनी

सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली होती. या शस्त्राचा दुरुपयोग स्वराज्यात होऊ नये अशी गांधींची अपेक्षा होती.

**ii) हरताळ :-** हरताळ म्हणजे सर्व दैनंदिन व्यवहार बंद. सरकारच्या जुलमी अन्यायी कायद्याचा व निर्णयाचा सामुहिक निषेध करण्यासाठी गांधीनी हा सत्याग्रहाचा मार्ग सुचवला, अन्यायाचे स्वरुप सर्व जनतेच्या लक्षात आणून देणे हा हरताळाचा हेतू असतो. लोकांमध्ये त्यामुळे जागृती होते. जनतेची होणारी पिळवणूक शोषण थांबण्यास मदत होते. हरताळाचा अर्थ संपूर्ण कामकाजावर बहिष्कार टाकणे किंवा काम बंद पाडणे होय. कॉलेज, बाजार दुकाने, बस, रेल्वे, सरकारी, निमसरकारी कार्यालये, सिनेमा वगैरे सर्व बंद, काम बंद झाले की आपोआप प्रतिपक्षाचे डोळे उघडतात. सर्व वर्गातील लोकांची हरताळाच्या समर्थनार्थ जर आपापले काम बंद ठेवले तर त्याचा परिणाम निर्णय कर्त्यावर ताबडतोब होतो. म्हणजे कामकाजावर बहिष्कार टाकून सरकाराला वठणीवर आणता येते.

हरताळाचे साधन हे नैतिक स्वरुपाचे आहे. या साधनाचा वापर वारंवार होऊ नये तसे झाल्यास त्याची परिणामकारकता कमी होते. हरताळाच्या साधनाचा दुरुपयोग केला तर जनजीवन विस्कळीत होते. लोकांची सहानुभूती नष्ट होण्याची भीती असते. त्यामुळे हरताळाचा उद्देश साध्य होत नाही.

हरताळ ऐच्छिक किंवा स्वयंस्फूर्त असावा. म्हणजे त्यात हिंसादडपशाही होत नाही. हरताळाचे महत्त्व सर्वांनी समजून घेऊन स्वच्छेने सर्व व्यवहार बंद ठेवले पाहिजे. जबरदस्ती, जुलूम केल्यास हरताळ यशस्वी होत नाही. बंदच्या काळात आर्थिक नुकसान सोसण्याची तयारी असली पाहिजे. या मार्गाने शांततेने लोकांना आपला रोष व्यक्त करता येतो.

अलिकडील काळात हरताळ, बंद वगैरे सत्याग्रही मार्गाचा फार दुरुपयोग झाल्याचे दिसून येते. उठसूठ कोणीही बंद जाहीर करु लागला आणि सक्तीने व्यवहार बंद पाडू लागला. बंदमुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. म्हणून बंद हे घटनाविरोधी आहे असा केरळ हायकोर्टाचा निर्णय आहे. हायकोर्टाच्या निर्णयाविरुद्ध कामगारसंघटना सुप्रिम कोर्टात गेल्या. म्हणजे कोणत्याही मार्गाचा अतिरेक झाला तर त्यावर बंदी घालण्याची वेळ कोर्टावर येते. याच कोर्टाने असा आणखी एक निर्णय दिला की, बंदच्या काळात जर काही नुकसान झाले तर त्यासाठी बंद पुकारणाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. मूळात महात्मा गांधीची हरताळाची कल्पना साम्यवादी विचारांपेक्षा वेगळी आहे. हरताळ करणाऱ्यांना इतर कामे किंवा कला

अवगत असली पाहिजे. म्हणजे हरताळ करणाऱ्यांनी केवळ त्यावरच अवलंबून रहू नये ही त्यामागची भूमिका आहे. त्याचबरोबर हरताळ करणाऱ्यांच्या मागण्या न्याय्य आणि स्पष्ट असाव्या जेणेकरुन इतरांनाही त्या स्पष्टपणे समजू शकतात. थोडक्यात बंद, हरताळ हा जनतेच्या हातातील एक उत्तम अहिंसात्मक सत्याग्रही मार्ग आहे. याद्वारे जनतेचा असंतोष सहजपणे व्यक्त होतो.

**iii) उपोषण :-** गांधीजींनी उपोषण हे सत्याग्रही साधन राजकारण व समाजकारण यामध्ये अतिशय लोकप्रिय केले आहे. किंवा सत्याग्रहाचे एक प्रभावी साधन आहे. उपोषण हा आत्मक्लेषाचा मार्ग आहे. गांधींच्या मते, मी आत्मशुद्धीसाठी उपोषण करतो. (माझी बाजू सरकारला योग्य वाटत नाही. याचे कारण माझ्यात काही दोष असावा तो द्वेष दूर करण्यासाठी उपोषण हा मार्ग आहे) उपोषणाचा मार्ग अहिंसक शांतता पूर्ण आहे. उपोषणामुळे समोरच्या व्यक्तीवर दडपण न येता त्याचे हृदयपरिवर्तन व्हावे. उपोषणामुळे मन स्वच्छ होते. अन्यायाचा प्रतिकार करण्याचे ते एक प्रभावी साधन ज्यांचा आत्मा शुद्ध आहे आणि जे शिस्तप्रिय आहेत ते उपोषण करु शकतात. प्रत्येकाने उपोषण करु नये ज्याचे मनोबल पक्के असेल तो उपोषण करु शकतो. व्यक्तीच्या नैतिक बळावर उपोषणाची परिणामकारकता अवलंबून असते. उपोषण एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे. उपोषण कर्त्याच्या ठिकाणी स्वार्थत्यागाची आणि आत्मशुद्धीची भावना असावी.

उपोषणामुळे प्रतिपक्षाला इजा किंवा दु:ख दिले जात नाही. उपोषण कर्त्याच्या आत्मक्लेषामुळे प्रतिपक्षाचे अंत:करण द्रवते आणि त्याचे हृदयपरिवर्तन होते. उपोषण या सत्याग्रही मार्गाचा अवलंब गांधींनी दक्षिण आफ्रिकेत आणि भारतात यशस्वीपणे केला. राजकीय, सामाजिक उद्दिष्टांसाठी उपोषणाचा मार्ग स्वीकारणारे गांधी हे पहिलेच नेते होते. गांधींनी उपोषणासाठी काही मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

उपोषणाचा उपयोग वारंवार करण्यात येऊ नये.

फळाची अपेक्षा न करता उपोषण चालु ठेवले पाहिजे.

उपोषणकर्त्यांनी जास्तीत जास्त आत्मक्लेष सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

उपोषणाचा दुरुपयोग करु नये.

श्रद्धा, शांतता आणि नि:स्वार्थी व्यक्तीनेच उपोषण करावे. उपोषणामागे स्वार्थी हेतू नसावा. नाहीतर उपोषण म्हणजे भूक हरताळ होते.

उपोषण आत्मशुद्धी आणि प्रतिपक्षाच्या हृदयपरिवर्तनासाठी करण्यात यावे

आमरण उपोषण करण्यास देखील गांधीजींची मान्यता होती. उपोषणाचा अवलंब आवश्यक परिस्थितीतच करावा.

**iv) बहिष्कार :-** लोकमान्य टिळकांनी प्रथम बहिष्काराचा अवलंब केला. गांधींनी बहिष्कार हा सत्याग्रहाचा मार्ग होऊ शकतो असे सांगितले. विशेषत: बहिष्काराचा मार्ग सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात उपयुक्त असल्याचे सिद्ध केले. जे लोक असहकार आंदोलनास सहभागी होत नाहीत त्यांच्याविरुद्ध बहिष्काराचा उपयोग करावा. असहकारात भाग न घेणाऱ्यांसाठी शिवीगाळ करणे, धाक दाखविणे किंवा अपशब्दांचा वापर न करता बहिष्काराचा अवलंब करावा. काही लोक स्वार्थापोटी जनतेसाठी चालविल्या जाणाऱ्या असहकार आंदोलनाला विरोध करतात. अशावेळी त्यांच्यावर बहिष्कार टाकावा. सामाजिक जीवनातील त्यांचा प्रवेश नाकारला जावा. सामाजिक बहिष्काराचे स्वरुप पारंपारिक अर्थाने लोकांना वाळीत टाकणे या स्वरुपाचे नाही. व्यक्तीला आवश्यक असणाऱ्या गोष्टीपासून वंचित ठेवणे ही एकप्रकारची हिंसाच असते. सामाजिक बहिष्कारामुळे समाजातील दुष्ट प्रवृत्तीला आळा बसतो. अशा प्रवृत्ती नष्ट होतात. संबंधित व्यक्तीला आपल्या चुकीची जाणीव होते.

बहिष्काराचा मार्ग सामाजिक आणि राजकीय जीवनात उपयुक्त ठरत असतो. जनतेची अवहेलना करणाऱ्यांना सहकार्य न देणे म्हणजे बहिष्कार होय. हिंसात्मक मार्गाने किंवा इतरांच्या दबावापोटी बहिष्काराचा मार्ग अंगिकारु नये. ब्रिटिश राजवटीत भारतीयांनी परकीय मालावर बहिष्कार टाकला होता. अशाप्रकारे आपल्या मागण्या पूर्ण करुन घेण्यासाठी बहिष्कार हे अतिशय उपयुक्त साधन आहे.

**v) हिजरत :-** हा मार्ग गांधींनी नाईलाज म्हणून सांगितला आहे. हिजरत म्हणजे एखाद्या भागात ज्या लोकांवर किंवा गटावर अन्याय होत असेल, प्रतिकार करण्याची शक्ती त्या व्यक्तीसमूहात नाही, त्यांनी ती जागा सोडून निघून जाणे, स्थलांतर (हिजरत) करणे होय. सत्याग्रहाचे एक प्रमुख साधन होय. एखाद्या व्यक्तीवर, गटावर सतत अन्याय होत असेल, सतत मानभंग होत असेल, त्याला विरोध करण्याची शक्ती नसेल किंवा अहिंसात्मक मार्गाने त्याचा प्रतिकार करणे अशक्य झाले असेल अशावेळी हिजरतचा उपयोग आवश्यक ठरतो. अन्याय सहन करण्यापेक्षा तो प्रदेश सोडावा. बारडोली, जुनागड, आणि विठ्ठलगड येथील सत्याग्रहींना गांधीजींनी हिजरतचा सल्ला दिला होता. सवर्णांच्या जुलूमाला हरिजन असमर्थ असल्यामुळे कोठा येथील हरिजनांना गांधींनी हिजरतचा सल्ला दिला होता.

**vi) धरणे :-** गांधींनी सत्याग्रहाचा हा एक मार्ग सांगितला. धरणे म्हणजे